GYANBODH
Volume: 1
Issue: 1
Sept - Oct 2024

# महिला बचत गट: काळाची नवी गरज

प्रा. डॉ. जितेश नारायण चव्हाण, जळगाव

---

**प्रस्तावना:**

थेंबे थेंबे तळे साचे या उक्तीप्रमाणेच उत्पन्न वाढविण्याचा एक भाग आहे आपण म्हणू शकतो मनुष्य ओवन जगताना त्यातही गोष्टी गेली चालों बात असेल, पैसा व्यक्ती समाज जीवन जगतांना त्याला वैयक्तिक आणि समाजासाठी लागते बचतीचे आयुष्य जगत असतो. ती महत्त्वाची गोष्ट भने पैसा होयः सथी असो या पुरुष जवळ पैसा असल्याशिवाय तो विनिमय करु शकत नाही या पुरुषसत्ताक अवस्थेमध्ये सभी हो सबंध बावतीत पुरुषांवर अवलंबून होती आजही काही प्रमाणात सर्व गोष्टीसाठी पुरुषांवर अवलंबून आहे अलिकडील काळात रवी जरी नोकरी उद्योग व्यवसाय करुन आर्थिक दृष्टीकोनातून स्वनिर्भर झाली असली तरी पुरुषसत्ताक कुटुंब प्रधान व्यवस्थेत तो बन्याच वेळा घुसमटली जाते. तिला स्वतःची आर्थिक मालकी राहत नाही परिस्थितीनुरुप काही वेळा आजारपण कुटुंबावर आलेली आपत्ती यासाठी फांच्या माध्यमातून पैसा उभा करवा लागता त्यामुळेच मग आर्थिक बचतीच्या माध्यमातूनच वेळी कौटुंबिक विकास आपात्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी ती खंबीर उभी राहू शकते. आणि या पर्याय म्हणजेच खास महिलांचा आर्थिक बचतीचा पर्याय समोर येतो तो म्हणाने महिला बचत गट ज्या माध्यमातून स्त्री फक्त आर्थिकदृष्ट्या सक्षम होत नाही तर सामाजिक, राजकीय अशा सर्व भूमिकेतून ती सक्षम होतांना दिसत आहे

बचत करणे हा मुळात मानवी स्वभाव आहे. आजची बचत हो उदयाची गरज भागवू शकते त्यामुळे प्रत्येकजण आपल्या क्षमतेनुसार बचत करण्याचा प्रयत्न करत असतो. नोकरदार वर्ग, उद्योजक वर्गही आपली बचत बैंक, सहकारी संस्था, आर.डी. एल. आय. सी. यामध्ये गुंतवणूक करतात. तसेच मुले आपल्या पर्किटमनीच्या माध्यमातून (गाल्ला) थोडीफार बचत करत असतात खिया मुख्यतः दागदागिन्याच्या स्वरूपात बचत करतात, तात्पर्य ऐषवेध हा शब्द प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे आपल्या जीवनाशी निगडीत आहे दैनदिन जीवनात माणूस वीज बचत पाणो बचत, इंधन बचत करून एक प्रकारे पैशांचीच बचत करत असतो, ज्याप्रमाणे चेंबे येथे तळे साचून त्याचे मोठ्या जलाशयात रूपातर होते त्याचप्रमाणे छोटया छोटया बचतीच्या रकमेतून उज्वल भविष्यासाठी मोठ्या रकमेची तरतूद करता येते

GYANBODH
Volume: 1
Issue: 1
Sept - Oct 2024

भारतात स्वातंत्र्यानंतर उदयोग धंदयांना चांगलीच गती मिळाली. त्याचेच फलीत महणजे बरेच व्यवसाय, उदयोग धंदे आणि कारखाने उभारण्यात आले. भारतात काही ठिकाणी संचयन आणि सहकार या गुणावर मोठ्या प्रमाणात सहकारी संरचा स्थापन झाल्या पण भारतासारख्या गरीब देशाला खरी गरज आहे तो लघुउद्योगाची आणि स्वंयः रोजगाराची हीच गोष्ट लक्षात घेऊन राष्ट्रपिता महात्मा गांधीनी आधीपासूनच स्वंयः रोजगार व लघु उद्योगाला प्राधान्य दिले. गाव सुधारले की देश सुधारतो असे त्यांचे मत होते त्यामुळे खेड़ी सुधारण्यासाठी त्यानी उपयोगाच्या विकेंद्रीकरणावर जास्त भर दिला पाहिजे आणि त्यातूनच खादी ग्रामोदयोगासारखी संस्था उदयाला आली याच गोष्टीची दखल घेत भारत सरकारने बचत गटाची निर्मिती केली भारतातील सामाजिक व आर्थिक गरजा लक्षात पेऊन गावागावामध्ये बचत गट स्थापन करण्यास लोकांना प्रोत्साहित केले. लघु उदयोगांना प्रेरणा देण्यासाठी व ग्रामीण जीवनाचा विकासासाठी भारत सरकारने उचललेले हे पहिले पाऊल आहे असे म्हणता येईल. परिणामी आज लाखोच्या संख्येत बचत गट निर्माण झालेले दिसून येतात. शहरी भागातही अनेक गटांची निर्मिती झालेली आहे त्यामुळे बचत गट हा स्वयंरोजगाराचा एक अप्रतिम स्वोत आहे. बचत गटांच्या माध्यमातून व्यक्ती स्वावलंबी तर होतोच पण त्याबरोबरच त्यास एक प्रकारचे आत्मिक समाधान मिळते. स्वतःच्या विकासाबरोबरच समाजाच्या विकासातही मोठी भर पडण्यास मदत होते.

**बचत गटाची पार्श्वभूमी:**

बचत गटांचे बीज डॉ. मोहम्मद युनुस यांनी बांग्लादेशात प्रथमतः १६७० च्या दशकात रोवले. बांग्लादेशातील गरिची दूर करण्यासाठी व कुटुंबे आत्मनिर्भर करण्यासाठी त्यांनी महिलांचे बचत गट सुरु केले याच धर्तीवर भारतामध्ये स्वंयः सहाय्यता बचत गटाची चळवळ म्हैसूर रिसेटलमेंट ॲण्ड डेव्हलपमेंट एजन्सी (मायराडा) या संस्थेने सुरु केलो मायराडाच्या माध्यमातून स्वंयः सहाय्यता गटाची निर्मिती होत असताना १६८० च्या दशकात नाबार्डने स्वंयः सहाय्यता गटाचे मॉडेल स्वीकारुन प्रामीण भागात प्रयोग सुरु केले सन १६६१-६२ मध्ये नाबार्डने बचत गटांना वित्तीय क्षेत्रात कायदेशीर मान्यता देऊन बचत गटाच्या चळवळीने प्रारंभ केला. १६६८-६६ मध्ये अंदाजपत्रकात स्वंयः सहाय्यता गटावर भर देऊन तरतूद करण्यात आलेली होती. स्वंयः सहाय्यता गटाचो पार्श्वभूमी पाहता आज देशपातळीवर व विविध राज्याच्या पातळीवर हे महीला बचत गट प्रभावशाली, गतीने कार्यरत असून देशाच्या आर्थिक विकासात भर टाकत आहेत पण महिलांच्या व्यक्तीमत्त्व विकासातही भर घालतांना दिसून येत आहे.

**बचत गटाचा उदय विकास व स्वरूपः**

**व्याख्या:**

1. एका विशिष्ट वस्तीतील एकाच सामाजिक, आर्थिक स्तरातील समविचारी समान गरजा असणाऱ्या १० ते १२ सदस्यांच्या संघटनेस स्वयंसहायता बचत गट असे म्हणतात.
2. 'सर्वार्थाने साधर्म्य असणाऱ्या सभासदांनी वाजवी संख्येने, स्वेच्छेने एकत्र येऊन सर्वांगीन उन्नती व प्रगतीकरीता बनविलेला व चालविलेला समूह म्हणजे स्वयंसहायता गट होय.

एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ या संत वचनांतील प्रेरणेतून बचत गटाची कल्पना पुढे आली. तसेच गरज ही शोधाची जननी आहे. या उक्तीप्रमाणे बचतीतून विकासाकडे किंवा समृद्धीकडे वाटचाल करून गरीबांची छोटी बैंक म्हणून बचत गट नावाची संस्था उदयाला आली

बचत गटामध्ये साधारणपणे कमीतकमी १० सदस्य व जास्तीत जास्त २० ते २५ सदस्य एकत्रीत येऊन मग ते पुरुष असोत की महिला असे संघटन रूपात बचत गटाची निर्मिती होते गटामध्ये सहभागी झालेल्या प्रत्येक सहभागी सभासदाने एक ठराविक रक्कम रोख स्वरूपात दरमहा किया दर आठवडा अशा स्वरूपात जमा करायी व या जमा रकमेचा उपयोग गटातील सहभागी सदस्यांनाच कर्ज रूपात उपलब्ध करून दिला जातो अशा पद्धतीने आपल्याला आपल्या आर्थिक अडचणीतून सुरळीतपणे बाहेर पडण्यासाठी बचत गट नावाची संस्था एक वरदान उरते

## बचत गटाची विकासाकडे वाटचाल:

भारतात स्वयंसेवी संस्थांचे बचत गटात फार मोठे योगदान आहे. १९९८ व ९९ च्या अंदाजपत्रकात स्वयंसहायता गटावर भर देऊन तरतूद करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे यशवंतराव चव्हान मुक्त विद्यापीठाने बचत गटाच्या अभ्यासक्रमास विद्यापीठ स्तरावर मान्यता देऊन अभ्यासक्रम सुरू केलेले असून लोक चळवळीत बचत गटाचे महत्व आहे. भारतासारख्या गरीब देशात गरीबी आणि दारिद्र्यामुळे बेरोजगारीच्या स्वरूपात अनेक समस्याचे आव्हान आहे यातून सुलभरित्या मार्ग काढण्यासाठी शासन स्तरावर वेगवेगळ्या योजना राबवल्या जातात त्यातीलच एक महत्वपूर्ण व उल्लेखनीय योजना म्हणजे स्वयंसहायता बचत गट ही एक प्रमुख योजना ठरू लागली आहे. महिला बचत गट योजनेचा मूळ उद्देश लहान लहान प्रमाणावर बचती गोळा करणे आणि गटातील सदस्यांच्या आर्थिक गरजा सोडविण्यासाठी कर्ज रूपाने मदत करणे हा होय.

भारतात स्वातंत्र्योत्तर काळात में कांचा प्रचंड प्रमाणत विस्तार होऊन त्या बेरोजगारांना कर्जरूपात अर्थसहाय देण्याचे काम करतात पण कर्ज देतांना तारणाच्या आधारेच कर्जाची रक्कम दिली जाते. आणि आपल्या गरीब जनतेकडे दोन वेळच्या जेवणाचा प्रश्न नीट सुटत नाही ती बिचारी जनता तारण काय देणार? अशा लोकांना स्वयंसहायता बचत गटाच्या माध्यमातून कोणतेही तारण न मागता कर्जपुरवठा केला जातो त्यामुळे गरीबांसाठी हा एक रामबाण उपाय ठरत आहे.

**बचत गटाची गरज व महत्व:**

बचत गट म्हणजे ३/४% संचयन, एकत्रीकरण, सामुहिक अध्ययन, एकसंघ विचार, स्वप्नांसाठी घेतलेली एकत्रीत गरूड झेप या सूत्राच्या आधारे बचत गटाचे महत्व अनंन्यसाधारण आहे अनेक विचारांना एकत्र गुंफणारी घट्ट वीण म्हणजे बचत गट होय. दुभंगलेल्या समाज मनास एकत्र आणणारा दुवा म्हणजे बचत गट होय तसेच आपल्या स्वप्नाची पूर्तता करणारा एक सुयोग्य मार्ग म्हणजे बचत गट होय त्याचबरोबर रक्ताचा, कुटुंबाचा व समाजाचा उत्कर्ष घडवून आणणारा एक महत्वपूर्ण उपकम म्हणजे बचत गट होय अशा वेगवेगळ्या पद्धतीने बचत गटाचे महत्व आपल्या लक्षात येते.

**१. कुटुंबाची आर्थिक ताकद:**

बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरण होण्यास मोठा हातभार लागतो सर्व महिला गटामध्ये एकत्रित येऊन काम करत असल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत होतो व त्या आत्मनिर्भर बनतात आपला देश एक गरीब देश आहे त्यामुळे अनेक कुटुंबामध्ये आर्थिक चणचण निर्माण होते त्यावर उत्तमरित्या मात करण्यासाठी बचत गटाचा उपयोग होतो. म्हणूनच बचत गट ही कुटुबाची आर्थिक ताकद बनते

**२. ग्रामोदयोगाला चालना:**

विना सहकार नाही उद्धार या उक्तीप्रमाणे बचत गट म्हणजे सर्वच सहभागी सदस्य संघठीतरीत्या कार्य करीत असतात. अनेक लोक एकत्र आल्यामुळे विचारांची देवाण घेवाण होऊन महिलांना स्थानिक पातळीवर लघुउद्योगाला चालना मिळते व ग्रामोद्धारास सुरुवात होते

बचत गटाच्या माध्यमातून गटात असणाऱ्या प्रत्येक सहभागी सदस्याला अंतर्गत कर्जपुरवठा उपलब्ध होत असल्यामुळे वैयक्तीक किंवा सामुहिकरीत्या लघुउद्योगासाठी मदत होते याच भूमिकेतून अनेक गावांमध्ये अशा प्रकारचे गट स्थापन करून वेगवेगळे उदद्योग महिलांनी सुरू केले आहेत ज्यामध्ये कुटोर उदयोग, शेळी पालन, विणकाम, शिलाईकाम, पिठाची गिरणी, पापड उदयोग, दालमिल, मिरची कोडप, लॉडी, झेरॉक्स, कुरीअर सेवा इत्यादो अशा कितीतरी लघुउदयोगाची सुरूवात अनेक ठिकाणी झालेली आपणास पहावयास मिळते. याआधारे महिलांना स्वतःचा रोजगार मिळतो व त्या स्वावलंबी होऊन आपल्या कुटुंबाचा आधार बनतात

**३. सामाजिक विकास:**

ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागांमध्ये बचत गटाचे अत्याधिक प्रमाण वाढलेले आहे त्यामुळे महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात बचतीची प्रवृत्ती निर्माण झाली आहे तसेच दिवसेंदिवस बचत गटांची संख्या वाढत आहे. त्यामुळे महिलांचा आर्थिक

व सामाजिक विकास झाला आहे फलस्वरूप ग्रामीण भागातील महिलांनासुद्धा आता आर्थिक व्यवहार चांगल्याप्रकारे समजत आहेत. ते बँकेचे व्यवहार सुरळीतपणे पार पाडतांता दिसत आहेत.

पूर्वी ज्या महिला रोजंदारीवर काम करत होत्या त्या आता स्वतःचा व्यवसाय सुरू करून समाजामध्ये दिमाखदार पद्धतीने वावरतांना दिसतात म्हणजेच त्या आर्थिक बाबतीत प्रगतीपथावर आहेत. पूर्वी केवळ चूल आणि मूल यातच गुरफटून राहणाऱ्या महिला आता बचत गटाच्या निमित्ताने घराबाहेर पडतांना दिसतात. बचत गटाच्या ज्या सभा असतात त्यानिमिताने त्या एकत्र येतात त्याठिकाणी त्यांच्या विचारांचे आदान प्रदान होते त्यातून त्यांचा आत्मविश्वास बळावतो व त्या स्वतःचा निर्णय स्वतः घेतात. त्याचबरोबर समाजामध्ये जे वेगवेगळे उपक्रम राबवले जातात त्यामध्ये त्या हिरीरीने सहभागी होतात यावरून त्यांचा सामाजिक विकासही होतांना दिसतो

### ४. व्यक्तिमत्व विकास:

महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होतांना दिसतो. महिला एकत्र आल्या की त्यांचे पटत नाही ही भूमिका आता बदलून महिला एकत्र येऊन एक विचाराने समाजाचा कायापालट करु शकतात.हे विचार समाज मानसात रुजू लागले आहेत ते निव्वळ महिला बचत गटांमुळे एकत्र येणे, विचारांची देवाण-घेवाण करणे, एकत्र कार्य-कृती करणे व यातून आत्मविश्वासाने स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास साधणे या गोष्टी महिला बचत गटांमुळे शक्य झाल्या आहेत. स्वतःमध्ये असणारे नेतृत्व गुण कला गुण, कौशल्य हे मुक्तपणे विकसित करु लागले आहेत. महिला बचत गटाच्या माध्यमामुळे महिलांचे व्यक्तिमत्व विकसित होत आहे.

### ५. जनजाग्रतीचे कार्य:

बचत गटाच्या माध्यमातून वेगवेगळे सामाजिक उपक्रम पार पाडले जातात त्यामध्ये मुलीच्या जन्माचे स्वागत, माता बालक सुरड स्पर्धा, लेक जगवा लेक वाचवा, छोटे कुटुंब सुखी कुटुंब वृक्ष संगोपन, पर्यावरणाचे रक्षण, स्त्री पुरुष समानता इत्यादी बाबत जनजागृती करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन बचत गटाच्या माध्यमातून केले जातात. या उपक्रमांमध्ये गावातील महिला सहभागी होतात. गाय समितीमार्फत सार्वजनिक प्रश्न मांडण्यासाठी महिलांचा पुढाकार असतो. या उपक्रमांच्या मार्फत उत्कृष्टरीत्या जनजागृतीचे कार्य केले जाते

### ६. नेतृत्व गुणाचा विकास:

बचत गटाची स्थापना झाल्यानंतर त्यातील सहभागी सदस्यांपैकी ज्या सदस्यामध्ये नेतृत्व गुण चांगले असेल अशा सभासदाला गटाचा प्रमुख म्हणून निवडला जातो नेतृत्व करणारी व्यक्ती आपल्या बुद्धीच्या व अनुभवाच्या जोरावर उत्तमरीत्या

कामगिरी पार पाडत असते. हे कार्य करत असतांना महिलांमध्ये जे काही नेतृत्वाचे गुण असतात ते निश्चितच वृद्धींगत होण्यास मदत होते पर्यायाने त्या महिलेचा स्वतःचा विकास होऊन इतरांना प्रेरणा मिळते.

अशा प्रकारे बचत गट ही जन्मभर पुरणारी व मृत्यूनंतर पुरून उरणारी संपदा आहे महिलांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावण्यासाठी बचत गट हा उपक्रम सरकारकडून चालवला जातो. यामध्ये स्विया एकत्र येऊन व्यवसाय करत असल्यामुळे त्यांच्यामध्ये सहकाराची भावना निर्माण होते व यामुळेच अनेक प्रकारचे उद्योग बचत गटाच्या चळवळीतून जन्माला आले आहेत

अलिकडेच शासनाच्या वतीने प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी बचत गटांनी बनवलेल्या वस्तूंचे, खादय पदार्थांचे मोठे प्रदर्शन भरवण्यात आले होते. यामध्ये वेगवेगळ्या व्यवसायातल्या महिला बचत गटांनी अतिशय मोठया प्रमाणात सहभाग नोंदवला. व कोटयावधी रूपयांची उलाढाल या प्रदर्शनानिमित्त झाली. यासाठी या आयोजनासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार यांचा निधीपण राखीव ठेवण्यात येतो. सरकार, जिल्हा परीषद, या मार्फत या गटासाठी काही निधी पुरवला जातो व वेळोवेळी राज्यस्तरीय प्रदर्शनेही भरवली जातात. या प्रकारच्या उपक्रमांमुळे बचत गटांना प्रोत्साहन मिळत असते. महिलांच्या उत्कर्षासाठी शासनाने उचललेले स्तुत्य पाऊल आहे

स्वयंसहायता बचत गट हे महिला सक्षमीकरणाचे प्रभावी साधन आहे. ग्रामीण समुदायातील मोलमजुरी करणाऱ्या तळागाळातील महिलांना एक व्यक्ती म्हणून जगण्याचा अधिकार व जाणीव महिला बचत गटाच्या माध्यमातून होते महिलामध्ये एक प्रकारचा आत्मविश्वास निर्माण होत आहे. संघटन, उदयोजकता, नेतृत्व सहकाराची भावना अशी अनेक कोशल्य वृद्धींगत होत आहेत ग्रामीण महिला आज सभाधिटपणे आपल्या न्याय व हक्कासाठी लढत आहेत. आपल्यावर होत असलेल्या अन्यायाचा प्रतिकार त्या निर्भिडपणे मांडत आहेत. एक व्यक्ती म्हणून आपल्याला जे अधिकार मिळायला हवे आहेत ते मिळाले पाहिजेत. यासाठी त्या झगडतांना दिसत आहेत ठेविले अनंते तैसेची रहावे असे न समजता हम होंगे कामयाब अशा आत्मविश्वासाने महिला समाजामध्ये वावरतांना दिसत आहेत

एकंदरीत महिला बचत गटामुळे महिलांच्या सर्वांगिण विकासात कमालीची प्रगती होत असलेली दिसून येते म्हणजेच महिला बचत गट हो काळाची नवीन गरज आहे असे दिसून येते

**संदर्भ ग्रंथ:**

1. बचत गट एक वरदान- श्री. गुलाबराव ठाकरे
2. महिला स्वयंसहायता बचत गट- प्रा. एम. यु मुलानी

3. उदयोजक जानेवारी २००९ टी एस जाधव
4. दै. लोकसत्ता-८ एप्रिल २०१७